## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर २००३

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००३/२०९३/प्र.क्र. ४६२/म-१.—ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई साठ) (यात यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, महसूल व वन विभाग, क्र.मुद्रांक २०००/प्र.क्र.१०२६/म-१, दिनांक ५ मार्च २००१ हा आदेश काढला आहे, आणि त्याद्वारे दिनांक ३१ मार्च २००६ रोजी समाप्त होणा-या कालावधीपर्यंत माहिती तंत्रज्ञान (सॉफ्टवेअर इ-कॉमर्स इंटरनेट इन्फ्रास्ट्रक्चर सेवा इ.) युनिटांच्या एकत्रीकरणात अंतर्भूत असलेल्या मालमत्तांशी संबंधित, उक्त अधिनियमाच्या अनुसूची-१ खालील अनुच्छेद २५, खंड (डअ) खालील अभिहस्तांतरणपत्राच्या संलेखावर, उक्त अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कात ९० टक्के सूट देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, विवक्षित फेरबदलांसह मुद्रांक शुल्कात अशी सूट देणे, महाराष्ट्र शासनास इष्ट वाटत आहे ;

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्यामुळे, ते याद्वारे असे जाहीर करीत आहे की, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (सॉफ्टवेअर इ-कॉमर्स इंटरनेट इन्फ्रास्ट्रक्चर सेवा इ.) युनिटांना किंवा कंपन्यांना अभिहस्तांतरणपत्राच्या संलेखावर (अनुच्छेद २५) आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिटांचे किंवा कंपन्यांचे एकत्रीकरण, विलिनीकरण किंवा पुनर्रचना यात अंतर्भूत असलेल्या मालमत्तांशी संबंधित असलेल्या अनुच्छेद २५, खंड (ड अ) खालील संलेखांवर दिनांक ४ जून २००३ रोजी सुरू होणाऱ्या व ३१ मे २००८ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीसाठी ९० टक्के सूट देण्यात येत आहे.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ, "माहिती तंत्रज्ञान युनिट" किंवा "माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिट" याचा अर्थ, ज्या युनिटाला विकास आयुक्त (उद्योग) यांने किंवा यासंबंधात त्याने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही अधिका-याने असे युनिट म्हणून प्रमाणित केले आहे, असे युनिट असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.